## ४) सोनेतारण कॅश क्रेडीट कर्ज :-

१) जिल्ह्यातील कोणताही रहिवाशी असणाऱ्या सज्ञान व्यक्तींसाठी सोन्याचे दागिने तारण ठेवून त्यावर कॅश क्रेडीट कर्ज घेता येईल.

२) २२ कॅरेटपेक्षा कमी कॅरेटच्या सोन्याचे दागिन्यावर कर्ज देता येणार नाही.

३) अर्जदार हा बँकेचे "ब वर्ग" सभासद असावा.

४) कॅश क्रेडीट कर्जखाती व्यवहार करणेसाठी एका वर्षाचे कालावधीमध्ये कितीही वेळा रक्कम उचल/भरणा करता येईल. त्यासाठी चेकबुक दिले जाईल.

५) नेहमीचे सोने तारण कर्जासाठी किमतीच्या ७५ % कर्ज उपलब्ध असले तरी कॅश क्रेडीट पध्दतीमध्ये ६० % व लाखी दागिने किमतीच्या ५० % कॅश क्रेडीट मंजूर केले जाईल.

**मुदत व व्याजदर -**

कॅश क्रेडीट कर्जाची मुदत १२ महिने राहील व सदर कर्जास द.सा.द.शे.१२ %(वरील व्याजदर प्रचलित धोरणानुसार राहील) व्याजदर आकारणेचा असून, सदर व्याज आकारणी परीणामकारक व्याजदराने केली जाईल.

**कर्ज मर्यादा -**

कमाल कर्ज मर्यादा रु.५.०० लाख मात्र राहील, किमान रु.५००००/- कॅश क्रेडीट पध्दतीने कर्ज घेता येईल.